**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**जि.प. बांधकाम विभाग (दक्षिण ),पुणे जिल्हा परीषद,पुणे**

४ था मजला यशवंतराव चव्हाण भवन,१ वेलस्ली रोड,कॅम्प,पुणे ४११००१

**दुरध्वनी क्र.- ०२०-२६१३३४२५** **Email :-zppuneworkssouth@gmail.com**

जा.क्र.जिप/बांध/यांत्रीकी/५१० /२०२५ दिनांक २४/ ११ /२०२५

# खुली निविदा दरपत्रक सुचनापत्र क्रं.०२/२०२५-२६

**विषय - :- बांधकाम उपविभाग़ इंदापुर करीता भाडेकराराने वाहन पुरवठा करणेसाठी दरपत्रक मागवणेबाबत**

बांधकाम विभाग दक्षिण जि.प.पुणे अखत्यारीत बांधकाम उपविभाग इंदापुर तालुक्यात विविध विकासकामांच्या नियंत्रण व देखभालीसाठी उपअभियंता,इंदापुर यांना किमान ( ४+१) आसनक्षमतेचे वाहन दि.३१/३/२०२६ अखेर ०४ महिने कालावधीसाठी पुरवठा करणेकरीता मोहोरबंद /सिलबंद दरपत्रके मागवण्यात येत आहेत. तरी (४ +१) प्रवाशी क्षमतेची वाहने पुरवठा करणा-या अधिकृत पुरवठादारांनी मोहरबंद दरपत्रके **कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग ( दक्षिण) ४ था मजला,यशवंतराव चव्हाण भवन,वेलस्ली रोड, पुणे-४११००१** या कार्यालयात **दि.२४/११/२०२५ ते दि. २८/११/२०२५ रोजी दुपारी.३.०० वाजेपर्यंत** पोहचतील अशा रितीने सादर करावीत.उशीरा प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ.क्रं. | पुरवठा करावयाचा तपशील | २५०० कि.मी साठी प्रती महिना दर(सर्व करासह) (GST वगळून) | २५०१ कि.मी च्या पुढे प्रति कि.मी दर |
|---|---|---|---|
| १) | **बांधकाम उपविभाग़ इंदापुर करीता भाडेतत्वावर किमान ( ४+ १) आसनक्षमतेचे प्रवाशी वाहन (वाहनचालक इंधनासह) भाडेतत्वावर पुरवठा करणेसाठी दरपत्रक मागवणेबाबत** | | |

**दरपत्रकासोबत खालील आवश्यक ती कागदपत्रे सादर करावीत.( लिफ़ाफ़ा क्रं.१ मध्ये सादर करावयाची कागदपत्रे**

१) संस्थेचे नौंदणी प्रमाणपत्र/ प्रवासी वाहतुकीचा प्रादेशिक परिवहन परवाना (PERMIT)प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत

२) पॅन कार्ड ची साक्षांकीत प्रत

३) वस्तु व सेवाकर प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत

४) यापुर्वी शासकीय कार्यालयास वाहन पुरवठा केल्याचे अनुभव प्रमाणपत्र

५) वाहनाची आर सी प्रत

६) वाहनाचा विहित मुदतीत असलेली इन्सुरन्स प्रत

**अटी व शर्ती**

१)वाहन ५ वर्षापेक्षा अधिक जुने नसावे म्हणजे दि.१ जानेवारी २०२१ या तारखेच्या पुर्वीचे वाहन नसावे.

२)वाहन आसन क्षमता किमान ( ४+ १) वाहन पुरवठा करण्यात यावे.

३)वाहन दरमहा अंदाजे २५०० कि.मी पर्यंत अंतर चालेल. २५०१ कि.मी पेक्षा जास्त चालविणे भाग पडले तर त्यासाठी देय असणारा वाढीव कि.मी चा दर हा निविदेद्वारे निश्चीत झालेप्रमाणे देण्यात येईल.

४)वाहनाच्या वापराचे क्षेत्र हे इंदापुर,दौंड,शिरुर तालुका हद्द तसेच संपुर्ण पुणे जिल्हा राहील.

५)वाहन इंधन,विमा,दुरुस्ती,सेवाकर,वाहनचालकाचा खर्च वाहनमालकाने करायचा आहे.

६)वाहन नादुरुस्त झाल्यास संबधीत सेवा पुरवठादाराने चार तासात पर्यायी व्यवस्था करणे बंधनकारक आहे. अन्यथा अन्य वाहन वापरलेमुळे होणारा जादा खर्च सेवा पुरवठादाराकडुन वसुल करण्यात येईल.

७)जि.प.बांधकाम विभाग दक्षिण यांचे करारनामा करतेवेळी विभागाच्या मागणीनुसार वाहनास प्रवासी वाहतुकीचा प्रादेशिक परिवहन परवाना (PERMIT)असणे आवश्यक आहे.तसेच आर सी /टी.सी फ़िटनेस सर्टिफ़िकेट,गाडिचे इन्सुरन्स,वाहनचालकाकडे LMV TR परवाना असणे बंधनकारक आहे.

७) ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर करण्यात येईल त्यांना र. रु..५००/- च्या स्टँप पेपरवर करारनामा स्वखर्चाने करुन द्यावयाचा आहे.

८) दरपत्रक मंजुर झाल्यानंतर तत्काळ १ % सुरक्षा रक्कम भरणा करणेची कार्यवाही न झाल्यास रक्कम जप्त करण्यात येईल तसेच निविदा रद्द करण्यात येईल.

पुणे जिल्हा परिषद, पुणे बांधकाम विभाग दक्षिण

**कार्यकारी अभियंता**
**बांधकाम विभाग (दक्षिण)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

प्रत – १) मा.उपमुख्य कार्यकारी( सा.प्र.वि) जि.प.पुणे
-/ सदर निविदा सुचना जाहिरात पुणे जिल्हा परिषद संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेस विनंती.

## लिफ़ाफ़ा क्रं.२ मध्ये सादर करावयाचे दरपत्रक

**प्रती,**

मा.कार्यकारी अभियंता सो
बांधकाम विभाग दक्षिण जि.प.पुणे

**विषय** - बांधकाम उपविभाग़ इंदापुर करीता भाडेतत्वावर किमान ( ४+ १) आसनक्षमतेचे प्रवाशी वाहन (वाहनचालक इंधनासह) भाडेतत्वावर पुरवठा करणेसाठी आमच्या संस्थेचे दरपत्रक मान्य करणेबाबत

**संदर्भ** – पुणे जिल्हा परिषद संकेतस्थळावरील आपल्या विभागाची जाहिरात दि.२४/११/२०२५

महोदय,

प्रसिद्ध झालेल्या दरपत्रक जाहिरातीत नमुद अटी व शर्ती मी वाचल्या असुन मला त्या मान्य आहेत.तरी खालीलप्रमाणे दरपत्रक सादर करीत आहे.क्रुपया दरपत्रक मंजुर करुन आमच्या संस्थेस /फ़र्मला काम मिळावे ही विनंती.

| अ.क्रं. | पुरवठा करावयाचा तपशील | २५०० कि.मी साठी प्रती महिना दर (सर्व करासह) (GST वगळुन) रुपये | २५०१ कि.मी च्या पुढे प्रति कि.मी दर (रुपये) |
|---|---|---|---|
| १) | **बांधकाम उपविभाग़ इंदापुर करीता भाडेतत्वावर किमान ( ४+ १) आसनक्षमतेचे प्रवाशी वाहन (वाहनचालक इंधनासह) ०४ महिने कालावधीकरीता भाडेतत्वावर पुरवठा करणेसाठी दरपत्रक मागवणेबाबत** | | |

पुरवठादाराची स्वाक्षरी
व शिक्का
वाहन पुरवठाधारकाचे पुर्ण नाव(                                    )